**कृपया प्रसिध्दीसाठी -** **9 जानेवारी 2013**

**माजी रेल्वे मंत्री श्री. राम नाईक यांची प्रतिक्रिया -**
***भाडेवाढ मागे घेऊन संसदेला सामोरे जा - राम नाईक***

**मुंबई, बुधवार :** ''रेल्वे मंत्री श्री. पवन बंसल यांनी 12 ते 20 टक्के अशी जबरदस्त रेल्वे भाडेवाढ करुन सामान्य माणसावर हल्लाच केला आहे. संसदेचे अधिवेशन चालू नसताना अशी भाडेवाढ करणे ही संसदीय परंपरांची अवमानना आहे. श्री. पवन बंसल हे पूर्वी संसदीय मंत्री होते हे लक्षात घेतल्यास त्यांचे हे कृत्य अधिकच गंभीर ठरते त्यामुळे जाहिर केलेली भाडेवाढ मागे घेऊन रेल्वे मंत्र्यांनी संसदेला सामोरे जावे अशी भारतीय जनता पार्टीची मागणी आहे'' अशी प्रतिक्रिया माजी रेल्वे राज्यमंत्री श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली आहे.

श्री. नाईक पुढे म्हणतात, ''सामान्य माणूस स्वयंपाकाचा गॅस, डिझेल, पेट्रोल यांच्या दरवाढीमुळे, तसेच त्या दरवाढीमुळे महागाईच्या दुष्टचक्राला गती मिळाल्यामुळे भरडला जात असतानाच रेल्वे भाडेवाढीच्या निर्णयाचा निषेध करावा तेवढा थोडाच ! युपीए सरकारच्या आठ वर्षांच्या काळात पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचे श्री. पवन बंसल हे पाचवे मंत्री आहेत. त्यामुळे रेल्वेच्या कारभारावरील सरकारची पकड ढिली झाली आहे, हे स्पष्ट आहे. सुरक्षा देणे हे सरकारचे कर्तव्यच आहे. सुरक्षा आणि सफाई ही दरवाढीसाठी दिलेली कारणे किंवा रेल्वे बजेटमध्ये भाडेवाढ करणार नाही हे आश्वासन हास्यास्पद आहे. कारण ही काही अचानक निर्माण झालेली कारणे नाहीत''.

**(कार्यालय सचिव)**